# प्रकरण पाचवे

# उपसंहार

बाबाराव मुसळे यांच्या 'वारुळ' या दलित--ग्रामीण साहित्याचा सीमारेषेवर लिहिल्या गेलेल्या कादंबरीचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधिकेत करण्याचा प्रयत्न केला आहे. तो अधिकाधिक अभ्यासपूर्ण, वस्तुनिष्ठ व व्यापक कसा होईल याकडे जाणिवपूर्वक लक्ष दिले आहे हा अभ्यास करताना प्राप्त झालेले निष्कर्ष समग्रपणे या प्रकरणात मांडले आहेत.

'बाबाराव मुसळे यांचा वाङ्मयीन परिचय, या पहिल्या प्रकरणात विषय निवडीपाठीमागची भूमिका स्पष्ट केली आहे. संशोधन विषयक पध्दतींची थोडक्यात माहिती दिली आहे. सुरुवातीला बाबाराव मुसळे यांचा जीवन परिचय करुन दिला आहे. कादंबरी म्हणजे काय? कादंबरी वाङ्मय प्रकाराबाबत विवेचन माहिती देऊन सांगून इ. स. १८५३ ते इ. स. १९८० पर्यंत कादंबरीचय विकासाचे टप्पे सांगितले आहेत. नंतर बाबाराव मुसळे यांच्या कथा संग्रहाविषयी माहेती मिळवून त्यांचा पहिल्या 'मोहोरलेला चंद्र' या कथासंग्रहातील कथांचा अभ्यास करुन कथांची वैशिष्टये पाहिली. नंतर त्यांचा दुसरा कथा संग्रह 'झिंगु लिखु लिखु' या कथासंग्रहातील कथांचा अभ्यास करुन स्त्री जीवनचित्रण करणाऱ्या त्यांचे दु:ख मांडणाऱ्या कथांतून स्त्रियांच्या दु:खाकडे लक्ष वेधण्याचा मुसळेंनी केलेला प्रयत्न पाहिला.

'हाल्या हाल्या दुधू ? या कादंबरीचा ग्रामीण जीवन चित्रणाशी एकरुप झालेला आशय पाहिला त्यांची दुसरी कादंबरी 'पखाल' बलुत्याने पाणी घालणाऱ्या पुंजाची शोकांतिका अभ्यासली. थोडक्यात बलुत्याने काम करणाऱ्या ग्रामीण भागातल्या बलुतेदारांचे! बदलत्या काळातील चित्रण लेखक मुसळे यात करतात. 'वारुळ' या कादंबरीने दलित कादंबरीतील एक अवकाश भरुन काढलेला आहे. दलित समाजचित्रणा बरोबर यामध्ये ग्रामीण जीवनचित्रण, गावगाडा ते उभा करतात. 'वारुळ' नंतर त्यांची 'पाटीलकी' ही आलेली कादंबरी आहे. आदीवाशी समाजाचा माणूस पोलीस पाटील होतो. आणि त्यामुळे त्याच्या संसाराला ग्रहण लागते यांचा सारीपाठ यात येतो. या पहिल्या प्रकरणात लेखकाचा वाङ्मयीन

परचियाबरोबर त्याला मिळालेले विविध पुरस्कार यांचाही नामोल्लेख या प्रकरणात केलेला आहे.

'वारुळ' कादंबरी: प्रेरणा व आशयसूत्रे' या दुसऱ्या प्रकरणात 'वारुळ' ची पाश्वभूमी तिच्या निर्मितीच्या प्रेरणा दलित ग्रामीण जाणीव इ. प्रमुख घटकांच्या बरोबर 'वारुळ' च्या आशयसूत्रांचा विचार केलेला आहे. ग्रामीण समाजवास्तव दलितांवरील अन्याय, भूक अपमानित जीवन, अज्ञान, लाचारी दुबळेपण, राजकारण, समाजकारण, दलितांच्या इच्छा, अपेक्षा रेखाटण्याच्या हेतूने 'वारुळची' निर्मिती झाली. त्यांचा अभ्यास प्रेरणांमध्ये केला नंतर सामाजिक कांदबरीचे स्वरुप याविषयी विवेचन करुन 'वारुळ' कादंबरीचे स्वरुप विविध आशयसूत्रांनी कसे बनले आहे याचा अभ्यास केला. त्यामध्ये कादंबरीत वास्तववादी कथानक येते, वास्तवादी आशयसूत्रांचा अभ्यास कादंबरीतील प्रत्येक घटना प्रसंगांच्या आधारे केला. मातंगांच्या तीन पिढयांच्या संघर्षाचे चित्रण 'वारुळ' मध्ये येते. 'वारुळ' सामाजिक कादंबरी आहे. स्वातंत्र्यानंतर १९८२ पर्यंतचा व्यापक पट दोन भागात येतो. मातंगांची पहिली पिढी गावकीच्या कामात गुंतलेली आहे. तर दुसरी पिढी समाजातील तरुणांची, शिकत असलेल्या सुशिक्षितांची, चळवळीत भाग घेणाऱ्यांची आहे. तिसरी पिढी नावापुरती कादंबरीत येते. मातंग—बौध्द—कुणबी या समाजाचे चित्रण प्रामुख्याने कादंबरीत येते.

'वारुळ' मध्ये राजकारण हे गावपातळीवरचे येते. बौध्द आंबेडकरांच्या विचाराने भारावले शिकले सवरले, त्यांनी सरकारी नोकऱ्या मिळविलया अधिकारपदे मिळविली राजकारणातून उतरुन त्यांनी स्वत:चे हक्क मागितले. याबाबत मातंग मात्र मागेच राहिले. त्यांना अ. म. मातंग संघाच्या माध्यमातून डॉ. भोपळेंचे नेतृत्व मिळाले. परिवर्तनवादी चळवळीचा सहवास लाभला त्यातून ते बौध्दांच्या पावलावर पाऊल ठेऊन ते राजकारणात उतरले त्यामुळे राजकीय आशयसूत्रांचाही अभ्यास केला. कादंबरीच मुळात मातंग समाजाच्या सामाजिक दस्तऐवज ठरावी असा ऐतिहासिक आशय यामध्ये येतो. म्हणून ऐतिहासिक आशयसूत्रांचाही अभ्यास या कादंबरीत केला आहे. त्यानंतर परिवर्तनाचा आणि दलितांचा अतूट संबंध आहे. परिवर्तनवादी चळवळीतून बौध्द सुधारले त्याच्या

पाठोपाठ मातंगही सुधारले. मातंगांच्या परिवर्तनवादी चळवळीच्या उगमापासून विकासापर्यंतचा इतिहास कादंबरीत येतो. या सर्व आशयसूत्रांचा अभ्यास या प्रकारणात केलेला आहे.

'वारुळ' कादंबरीतील व्यक्तिरेखा' या तिसऱ्या प्रकरणात 'वारुळ' कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखांबरोबरच गौण—व्यक्तिरेखांचा अभ्यास केला गेला आहे. या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा 'प्रभू' आहे. त्याचे बालपण शिक्षण त्याचे तरुणपण त्याचा नम्रपणा, त्याचे साधे सरळ संयमी विचार करणारा स्वतःचे जीवन समाजाला वाहणारा सामाजाच्या हिताकरिता समाजकारणाला राजकारणाची जोड देणारा प्रभू हा नायक आहे. परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यमातून समाजाचे संरक्षण करतो. गणा हा खलनायकाच्या भूमिकेत कादंबरीभर येतो. सदैव चांगल्या कामात आड येतो. विध्वंसक वृत्तीचा आहे. त्याबरोबर येसाजी की जो येसकर आहे. आपल्या मुलावर प्रभूवर चांगले संस्कार करतो. याबरोबरच नाथा, हारजी, भिका, संपत, इत्यादी गौण तसेच महत्वाच्या व्यक्तिरेखा येतात.

कादंबरीत मातंग समाजाबरोबर बौध्दांचा शिदनाक, चिनकुनाक, पांडनाक या गौण पण महत्त्वाच्या व्यक्तिरेखा येतात. सिदाजी पाटील, भगवान पाटील, विनायक पाटील, लिंबा बेले, विकास बेले, नामदेव बेले, इ. कुणबी समाजातील व्यक्तिरेखा कादंबरीत येतात. या सर्व व्यक्तिरेखांचा अभ्यास करीत असताना 'प्रभू'ची व्यक्तिरेखा स्पष्टपणे कांदबरीभर जाणवते व इतर व्यक्तिरेखा त्याच्याभोवती असलेलल्या दिसतात उदा: कुलकर्णी मास्तर, भोसले मास्तर, ज्योती, तायडे गुरुजी, सूर्यकांत साठे, इ. काही व्यक्तिरेखा तर कादंबरीत नावापुरत्या आल्या आहेत. कादाजित लेखकाने कथानकाच्या आवश्यकतेनुसार त्यांचे (पात्राचे) चित्रण केलेले असावे त्यामुळे 'प्रभू' हीच व्यक्तिरेखा व त्याच्या जोडीला 'गणा' याच व्यक्तिरेखा ठळकपणे समोर येतात. अन्य व्यक्तिरेखा त्याप्रमाणात अधिक स्पष्ट होत नाहीत. कादंबरीतील त्यांचे चित्रण अल्पसे वाटते.

'वारुळ' कादंबरीचे समाजिक व वाङ्.मयीन मूल्यमापन' या प्रकरणात 'वारुळ' ची निवदेन पध्दती सांगितली आहे. कोणत्या पध्दतीचा वापर लेखक करता हे सांगितले आहे. कादंबरीत तृतीय पुरुषी निवेदनाचा वापर केला आहे. निवेदन

ओघवते आहे. वाचकांना ते जागे ठेवते. नंतर 'वारुळ' मधील समाजदर्शन यात मांतग, बौध्द, कुणबी या तिन्ही समाजाची माहिती दिली आहे. वारुळ मधील संवाद हे प्रसंगानुसार छोटे—मोठे येतात. जास्तीत जास्त सूक्षपणे संवादाचा अभ्यास केला. 'वारुळ' ची भाषा शैली अभ्यासली 'वारुळ' मध्ये वऱ्हाडी बोली भाषा येते लेखकाने ती संवादासाठी वापरली आहे. निवेदनासाठी प्रमाण भाषेचाच वापर केला आहे. भाषेत हिन्दी शब्दांचा वापर केलेला आहे. म्हणी, वाक्यप्रचार इ. वापर समर्पक पणे लेखकांनी केलेला आहे. 'वारुळ' हे कादंबरीला शीर्षक का दिले? त्याची प्रतिकात्मकता सांगितली आहे. नंतर गावगाडा कादंबरीत रेखाटताना लेखक जी तटस्थता बाळगतात. त्याचा अभ्यास या प्रकरणात केला व निष्कर्ष नोंदवले.

- निष्कर्ष :—

१) 'वारुळ' ही मुसळेंची विदर्भातील दलित—ग्रामीण जीवनचित्रण करणारी कादंबरी आहे.

२) 'वारुळ' मध्ये एक व्यापक पट येतो.

३) मातंग जीवनचित्रणाबरोबर बौध्द, कुणबी यांचे जीवनचित्रण येते.

४) कादंबरीत मुख्य व्यक्तिरेखेबरोबर गौण पण भरपूर व्यक्तिरेखा येतात.

५) कांदबरीत वास्तववादी,ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, परिवर्तनवादी अशी आशयसूत्रे येतात.

६) अण्णाभाऊ साठेनंतर दलित कादंबरीतील रिक्त अवकाश मुसळेंनी भरुन काढला.

७) कांदबरीतील घटना,प्रसंग, पात्रचित्रण वास्तवतेच्या जवळ जाणारे आहे.

८) बौध्द समाजाच्या परिवर्तनाबरोबर मातंग समाजाचे अ. म. मातंग संघाच्या माध्यमातून झालेले परिवर्तन व त्याचे तपशिल कादंबरीत येतात.

९) दलितांवर होणारा अन्याय, आत्याचार याचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष दर्शन घडविण्याचा प्रयत्न कादंबरीत केला आहे.

१०) मातंग, बौध्द, सवर्ण यांमधील एकमेकांचा संघर्ष टिपला आहे.

## छायाचित्र क्र. १

बाबाराव मुसळे यांचे छायाचित्र





कुटुंबियासोबत बाबाराव मुसळे (छायाचित्र क्र. २)
मुलगा नितीन
वडील गंगारामजी मुसळे
बाबाराव मुसळे
पत्नी अरुणा मुसळे
मुलगा अविनाश

परिशिष्ट १

## — परिचय —

| | | |
|---|---|---|
| पुर्ण नांव | : | बाबाराव गंगाराम मुसळे |
| शिक्षण | : | एम. एम. (मराठी), बी.एस्सी (जीव.), बी.एड् |
| जन्मतारीख | : | दहा जून एकोणवीसशे एकोण पन्नास |
| व्यवसाय | : | माध्यमिक शिक्षक |
| कार्यरत संस्थचा पत्ता | : | श्री. पारेश्वर विद्यालय, पार्डी टकमोर, ता. जि. वाशीम. |
| प्रकाशित साहित्य | : | कादंबरी — १) हाल्या हाल्या दुधू दे २) पखाल ३) वारुळ ४) पाटीलकी<br>कथासंग्रह — १) मोहरलेला चंद्र २) झिंगू लुखू लुखू<br>आगामी — मृद्रग (ललित), कळप (कादंबरी) ठिणग्या (कादंबरी), काशी ते कन्याकुमारी (प्रवास), प्रकाश ज्ञानबा काळे (कादंबरी) |
| साहित्यिक पुरस्कार | : | १) हाल्या हाल्या दुध दे — मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांनी डॉ. आनंद यादव, डॉ. द. दि. पुडे यांच्या सहकार्याने आयोजिलेल्या 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी' या उपक्रमात एकमेव म्हणून प्रकाशित केलेली कादंबरी.<br>२) पखाल — महाराष्ट्र शासनाचा १९९५—९६ चा उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार.<br>३) वारुळ — १) महाराष्ट्र शासनाचा २००४—२००५ चा उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार.<br>२) विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांचा कै. पु. ल. देशपांडे स्मृती—पुरस्कार.<br>३) जनसाहित्य परिषद अमरावतीचा जनसारस्वत वाचनालय पुरस्कार.<br>४) मराठी अनुवाद परिषद, बुलढाण्याचा |

'तुका म्हणे' पुरस्कार.

५) पद्मगंधा प्रतिष्ठान, नागपूरचा साहित्य पुरस्कार.

६) कै. यशवंत दाते स्मृती प्रतिष्ठान, वर्धा यांचा बाबा पद्मनजी साहित्य पुरस्कार.

७) शब्दपंढरी प्रतिष्ठान, लातूरचा 'शब्दपंढरी' साहित्य पुरस्कार.

४) मोहरलेला चंद्र — कै. भि. ग. राहेमारे पुरस्कार कोपरगांव (१९९२)

५) झिंगू लुखू लुखू — लोकमत — कामगार साहित्य संमेलन, सोलापूर यांचा (१९९४) चा पुरस्कार.

अन्य पुरस्कार : राज्यपुरस्कार आदर्श शिक्षक (२००२)

इतर : — अध्यक्ष, अंकुर साहित्य संमेलन, मालेगांव (१९८५)

— अध्यक्ष, तिसरे ग्रामीण साहित्य संमेलन, शेंबाळ पिंप्री जि. यवतमाळ (१९८८)

— सदस्य, मराठी अभ्यास मंडळ, अमरावती विद्यापीठ (१९८७—९०)

— सदस्य, जिल्हा साक्षरता सर्वसाधारण समिती, जिल्हा वाशिम (२००६)

कथाकथन : आकाशवाणी, नागपूर सह विविध साहित्य—संमेलने, वाङ्मयीन व्यासपीठांवरुन २०० पेक्षा अधिक वेळा कथाकथन.

विद्यापीठ स्तरावर सहभाग : — अमरावती विद्यापीठ एम. ए. भाग—१साठी 'पखाल' कादंबरीचा समावेश होता

— अमरावती विद्यापीठाच्या बी.ए. भाग—२ साठी 'दावणीचा बैल', 'अल्पभुधारक' या कथांचा

समावेश होता.

— अमरावती, नागपूर, नांदेड, औरंगाबाद, पुणे, कोल्हापूर इ. विद्यापीठात कथा—कादंबऱ्यांचा एम्. फील आणि पी. एच्. डी. साठी अभ्यास.

पत्र व्यवहाराचा पत्ता : बाबाराव मुसळे
१४३ एल. आय. जी., सेक्टर — २
आय.यु.डी.पी. कॉलनी, वाशीम — ४४४५०५
फो. (०७२५२) २३११०१